**<u>रे. दि. मु. नं.११४/२००४ मधील निशाणी क्र.१६३ व नि.१६५ वरील आदेश</u>**

(सिंधु रामदास खंडाईत वगैरे विाा राजेंद्र गणपती डफळे वगैरे)

प्रस्तुतचे अर्ज प्रतिवादी क्र.६ यांनी पुरावा डिसकार्ड/रद्द करणेबाबतचा आदेश व त्यांच्याविरुध्द झालेला ‘उलटतपास नाही’चा झालेला आदेश रद्द होवून, पुरावा देणेस व उलटतपास घेण्यास संधी मिळणेकरीता दाखल केलेले आहेत. सदरच्या अर्जांवर वादी यांनी म्हणणे देवून आक्षेप घेतला आहे.

०२. प्रस्तुतचे अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी क्र.६ यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा अर्ज हा गुणदोषावर चालविण्याकरीता प्रतिवादी क्र.६ ला उलटतपास घेण्यास व पुरावा देण्यास संधी देणे न्यायोचित होईल. प्रस्तुतचे अर्ज नामंजुर केलेस प्रतिवादी क्र.६ यांना अपरिमित नुकसान होईल. सदरचा दावा हा खुप जुना असल्याचे दिसून येते. तसेच प्रस्तुतच्या अर्जाचे काम प्रतिवादी क्र.६ यांच्या वर्तुणुकीमुळे लांबणीवर पडलेचे दिसून येते. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणे योग्य होईल. सबब, पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.६ यांचे अर्ज निशाणी १६३ व निशाणी १६५ रक्कम रुपये ७००/- (रक्कम रुपये सातशे) खर्च वादी यांना देणेचे अटीवर मंजुर करण्यात येतात.

२. प्रतिवादी क्र.६ यांचेविरुध्द झालेला ‘उलटतपास नाही’ चा व पुरावा डिसकार्ड झालेचा आदेश रद्द करण्यात येतात.

३. प्रतिवादी क्र.६ यांनी पुढील नेमले तारखेस न चुकता साक्षीदाराचा उलटतपास घ्यावा व नंतर साक्षीपुरावा सादर करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Chetna Yashwant Neware
Date: 2022.10.01 17:32:35 +0530

पाटण, जिल्हा सातारा.
दिनांकः २८.०९.२०२२

(सी.वाय.नेवारे)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
पाटण.